**<u>ठळक बातम्या</u>**

- पश्चिम आशियातल्या अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सच्या दरात १९५ रुपये वाढ/ घरगुती वापराच्या सिलेंडरच्या दरात बदल नाही

- विमान इंधनाच्या दरात देशी कंपन्यांसाठी साडेआठ टक्के वाढ/ परदेशी कंपन्यांसाठी दर दुपटीनं वाढले.
- वस्तू आणि सेवा कर संकलनात मार्च २०२६मधे ८ पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ

**आणि**

- गडचिरोलीत काल नऊ नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

**<><><><><><>**

पश्चिम आशियातल्या अस्थिर परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, तेल विपणन कंपन्यांनी देशातल्या महानगरांमध्ये व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सचे दर वाढवले आहेत. त्यामुळे दिल्लीत व्यावसायिक एलपीजी गॅस सिलिंडर्सचे किरकोळ दर आता २ हजार ७८ रुपये ५० पैसे, कोलकातामध्ये २ हजार २०८ रुपये, मुंबईत २ हजार ३१ रुपये तर चेन्नईमध्ये तो २ हजार २४६ रुपये ५० पैसे करण्यात आल्याची माहिती इंडियन ऑइल कोर्पोरेशनच्या वेबसाईटवर दिली आहे. १९ किलोच्या व्यावसायिक एलपीजी सिलिंडरचे सुधारित दर आजपासून लागू झाल्याचं यात म्हटलं आहे. देशात स्वयंपाकाच्या गॅसचे दर मात्र स्थिर आहेत.

विमानासाठी वापरल्या जाणाऱ्या इंधनाच्या दरातही साडेआठ टक्के वाढ झाली असून, दिल्लीत ते प्रति किलोलिटर २ लाख ७ हजार रुपये, कोलकातामध्ये २ लाख ५ हजार रुपये, मुंबईत १ लाख ९४ हजार रुपये, तर

चेन्नईमध्ये ते  २ लाख १४ हजार रुपये करण्यात आले आहेत. परदेशी विमान कंपन्यांसाठी ही दरवाढ दुप्पट झाली आहे.

देशांतर्गत विमान कंपन्यांसाठी जेट इंधनाच्या दरात अंशतः आणि टप्प्याटप्प्याने वाढ केल्यामुळे प्रवाशांना तिकीट दरात तीव्र दरवाढ सोसावी लागणार नाही, असं नागरी विमान वाहतूक मंत्री के. राममोहन नायडू यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

नवीन आर्थिक वर्षाची सुरुवात झाल्यामुळे आजपासून आर्थिक नियमांमधल्या महत्वाच्या बदलांसह अनेक आर्थिक सुधारणा अमलात आणल्या जातील. सहा दशकांपेक्षा जुन्या प्राप्तिकर कायद्याच्या जागी आजपासून नवीन प्राप्तिकर कायदा लागू होईल. यामध्ये जुन्या कायद्यातल्या कालबाह्य तरतुदी काढून टाकण्यात आल्या असून, गुंतागुंतीचे नियम सोपे  करण्यात आले आहेत. करदात्यांसाठी अनुपालन अधिक सुलभ करून करप्रणाली सोपी करण्याच्या उद्देशाने हा कायदा तयार करण्यात आला आहे.

भारतीय रिझर्व्ह बँकेनं दिलेल्या निर्देशानुसार, देशातल्या सर्व डिजिटल पेमेंट व्यवहारांसाठी आजपासून ‘टू-फॅक्टर ऑथेंटिकेशन’चे नियम पाळणं बंधनकारक असेल. आर्थिक वर्ष २०२६-२७ साठी, ‘फास्टॅग’ च्या वार्षिक पासचं सुधारित शुल्क आजपासून लागू होईल. आणि पॅन कार्डसाठीचा अर्ज, तसंच ‘पॅन’ नंबर अद्ययावत करण्याबाबतचे सुधारित नियम देखील आजपासून लागू होतील.

<><><><><>

पुद्च्चेरी आणि ४ राज्यातल्या विधानसभा निवडणुकांसाठी प्रचाराला वेग आला आहे. ऐकूया एक वृत्तांत

# व्हॉईस कास्ट

*(आसाम, पश्चिम बंगाल, तामिळनाडू, केरळ या राज्यांमध्ये आणि पुद्दुचेरी या केंद्रशासित प्रदेशात या महिन्यात विधासभा निवडणुका होत आहेत. या निवडणुकांसाठीचा प्रचार आता चांगलाच रंगला आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज आसामच्या गोगामुख इथं प्रचारसभा घेतली त्यांची दुसरी प्रचारसभा विश्वनाथ इथं होणार आहे. आसामच्या १२६ विधानसभा मतदार संघांसाठी येत्या ९ एप्रिल रोजी मतदान होणार असून या ठिकाणी प्रचार जोरात सुरु आहे.*

*पश्चिम बंगाल मधे सर्व पक्ष हिरीरीने प्रचार करत असून अनेक नेते कार्यकर्ते पक्षांतर करत आहेत. टेनिसपटू लिअँडर पेसने काल तृणमूल काँग्रेसला सोडचिठ्ठी देऊन भाजपात प्रवेश केला. पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी भवानीपूर मतदारसंघातून येत्या ८ एप्रिल रोजी उमेदवारी अर्ज दाखल करतील. भाजपानं भवानीपूर मतदारसंघात आपला प्रचार आधीच सुरु केला आहे.*

*तमिळनाडूत सत्ताधारी द्रमुक आणि काँग्रेस आघाडी तसंच अखिल भारतीय अण्णाद्रमुक पक्ष आणि भाजपा यांची युती जोमाने प्रचार करत आहे.*

*पुद्दुचेरी विधानसभेच्या ३० जागांसाठी मतदान होणार असून आदर्श आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी इथं ड्रोनच्या सहाय्यानं गस्त घालण्यात येत आहे. ड्रोनच्या या गस्तीमध्ये मन्नादीपेठ विधानसभा मतदारसंघात मतदारांना पैसे वाटतांना तिघांना ताब्यात घेण्यात आलं आहे.)*

**<><><><><><>**

एफसीआरए अर्थात परकीय चलन योगदान नियमन विधेयकावरून विरोधी पक्षांनी केलेल्या गदारोळामुळे, आज अधिवेशन सुरू झाल्यावर पहिल्या पाच मिनिटांतच लोकसभेचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. त्यापूर्वी, विरोधी पक्षांनी संसद परिसरात या विधेयकाच्या विरोधात निदर्शनं केली. या घोषणाबाजीत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष आणि इतर अनेक विरोधी पक्षांच्या खासदारांनी सहभाग घेतला.

अनुसूचित जाती जमातींसाठीच्या प्रवेशात २५ टक्क्यांची घट करून दिल्लीतलं जवाहरलाल नेहरू विद्यापीठ सामाजिक न्यायाच्या उद्दिष्टांना कमी लेखत असल्याचा आरोप काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दिग्विजय सिंह यांनी आज राज्यसभेत शून्य प्रहरात केला. जेएनयूत राखीव प्राध्यापक नियुक्तीतली अनियमितता, विद्यापीठाच्या मूळ तत्वांविरोधात जाणारी कुलगुरूंची वक्तव्यं अशा बाबींचा त्यात

समावेश असल्याचं सिंह म्हणाले. एकिकडे जेएनयूचे दोन माजी विद्यार्थी सत्तेत असताना राष्ट्रीय संस्थात्मक मानांकनात देशभरातल्या सर्वोत्तम १० विद्यापीठांमध्ये स्थान मिळवलेलं हे विद्यापीठ राष्ट्रीय एकात्मता, लोकशाही मूल्य आणि सामाजिक न्यायाच्या मूळ उद्दिष्टांपासून भरकटत असल्याचा विरोधाभासही सिंह यांनी नमूद केला. जेएनयू आणि इतर केंद्रीय विद्यापीठांमध्ये आरक्षणाच्या नियमांचं काटेकोर पालन सुनिश्चित करण्याचं आवाहन त्यांनी सरकारला केलं.

**<><><><><>**

राज्यसभा खासदार सुधा मुर्ती यांच्या टाईड्स ऑफ टाईम या पुस्तकाचं प्रकाशन आज उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांच्या हस्ते झालं. या पुस्तकात संसदीय शिल्पाचं कालातीत सौंदर्य आणि प्रतिकात्मकता विशद करण्यात आली आहे. असं उपराष्ट्रपती यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

वस्तू आणि सेवा कर संकलनात मार्च २०२६मधे ८ पूर्णांक ८ दशांश टक्के वाढ झाली आहे. गेल्या वर्षीच्या मार्च महिन्यात एकूण जीएसटी संकलन एक लाख ८३ हजार कोटी रुपये झालं होतं ते यंदा २ लाख कोटीहून जास्त झालं आहे. देशांतर्गत करातून एक लाख ४६ हजार कोटी रुपये तर आयातीवरच्या करातून ५३ हजार ८६१ कोटी रुपये सरकारी तिजोरीत जमा झाले.

**<><><><><>**

ओडिशा राज्याच्या स्थापना दिनानिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु उपराष्ट्रपती सी.पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ओडिशाच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. हा क्षण ओडिशाचा समृद्ध सांस्कृतिक वारसा, अनादी काळापासूनची परंपरा आणि इथल्या जनतेच्या उर्जेचा विचारांचा उत्सव साजरा करण्याचा आहे. असं राष्ट्रपतींनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यातला ओडिशाच्या जनतेचा सहभाग आणि राष्ट्रनिर्माणात त्यांनी

दिलेलं योगदान सर्वांना प्रेरणादायी असल्याचंही त्यांनी म्हटलं आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आपल्या शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे की, ओडिशा त्यांच्या अध्यात्मिक आणि सांस्कृतिक वारशामुळे उच्च स्थानावर असून ओडिशाच्या कला, संगीत आणि साहित्यानं देशाच्या समृद्धीत भर टाकली आहे. गृहमंत्री अमित शहा आणि लोकसभा सभापती ओम बिर्ला यांनीही ओडिशा दिनाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

गडचिरोली इथं काल नऊ नक्षलवाद्यांनी पोलिसांपुढे आत्मसमर्पण केलं. पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी देशाच्या संविधानाची प्रत देऊन त्यांचं मुख्य प्रवाहात स्वागत केलं. या ९ जणांवर मिळून एकूण ३० लाख रुपयांचं बक्षीस होतं. आत्मसमर्पण करणारे सर्व नक्षलवादी छत्तीसगडमधे इंद्रावती क्षेत्रीय समिती आणि नॅशनल पार्क क्षेत्रीय समितीत कार्यरत होते. सध्या जिल्ह्यात सहा सशस्त्र नक्षली शिल्लक असल्याचं पोलिस अधीक्षक नीलोत्पल यांनी सांगितलं.

<><><><><>

जम्मू आणि काश्मिरच्या गांदरबल जिल्ह्यात काल रात्रीपासून सुरु असलेल्या दहशतवादी विरोधी मोहिमेत एक दहशतवादी ठार झाल्याची माहिती लष्कराच्या प्रवक्त्यानं दिली. लष्कर आणि जम्मू काश्मीर पोलीस दलानं गांदरबल जिल्ह्याच्या अराहाना भागात ही कारवाई सुरु केली आहे. ही मोहिम अद्याप सुरु असल्याचंही त्यानी म्हटलं आहे.

<><><><><>

साहित्य अकादमीतर्फे २०२५ या वर्षासाठी जाहीर करण्यात आलेले विविध २४ भाषांसाठीचे साहित्य पुरस्कार काल नवी दिल्लीत प्रदान करण्यात आले. मराठी भाषेत जळगावचे प्रसिद्ध चित्रकार, लेखक राजू बाविस्कर यांना, काळ्यानिळ्या रेषा

या आत्मकथनासाठी साहित्य अकादमी पुरस्कार प्रदान करण्यात आला. अकादमीचे अध्यक्ष माधव कौशिक यांच्या हस्ते बाविस्कर यांना सन्मानित करण्यात आले. मानचिन्ह, शाल आणि एक लाख रुपये असं या पुरस्काराचं स्वरूप आहे.

**<><><><><><>**

इंडीयन प्रिमियर लिग- आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज लखनऊ सुपर जायंट्स आणि दिल्ली कॅपिटल्स यांच्यात सामना होणार आहे. लखनऊ इथं संध्याकाळी साडेसात वाजता या सामन्याला सुरूवात होईल. काल झालेल्या सामन्यात पंजाब किंग्सनं गुजरात टायटन्सवर तीन गडी राखून विजय मिळवला.

**//<><><><><><>//**